**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

अधिवेशनाचा शुभारंभ " वंदे मातरम् " या गीताच्या समूह गायनाने झाला

---

**पृ.शी. मु.शी** : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत पटलावर ठेवणे

सचिव : महोदय, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत आज, दिनांक 16 मार्च 2009 रोजी राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत मी सभागृहापुढे ठेवतो.

**सभापती** : विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले अभिभाषण येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.मु.शी** : सदस्यांचा परिचय

श्री.छगन भुजबळ ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्थे तर्फे निर्वाचित श्री.अशोक महादेव मानकर यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

---

**पृ.शी. मु.शी** : मंत्र्यांचा परिचय

श्री. छगन भुजबळ ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री. नारायण तातू राणे यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, यानंतर श्री. राधाकृष्ण बाळासाहेब विखे - पाटील यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, यानंतर श्री. दिलीपराव दगडूजीराव देशमुख यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, यानंतर श्री. मोहम्मद आरीफ नसीम खान यांचा राज्य मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MAP/

**पृ.शी. मु.शी .** सदस्यांच्या राजीनाम्याची घोषणा

**सभापती** : विधान परिषद नियम 266 (5) च्या तरतुदींना अनुसरुन मी सभागृहाला असे कळवितो की, महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवडून आलेले श्री. गोविंदराव वामनराव आदिक यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेतील त्यांच्या जागेचा दिलेला राजीनामा शुक्रवार, दिनांक 6 मार्च, 2009 रोजी मध्यान्होत्तर स्वीकारला आहे.

त्याच प्रमाणे अहमदनगर स्थानिक प्राधिकारी संस्थाव्दारा महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवडून आलेले श्री. यशवंतराव कंकरराव गडाख यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेतील त्यांच्या जागेचा दिलेला राजीनामा सोमवार, दिनांक 16 मार्च, 2009 रोजी मध्यान्हपूर्व स्वीकारला आहे.

----

यानतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शोक प्रस्ताव

मु.शि.: श्री.आर.वेंकटरमण, भारताचे माजी राष्ट्रपती, सर्वश्री हरिभाऊ पुर्णाजी गोळे, प्रभाकर पांडुरंग संझगिरी माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

श्री.छगन भुजबळ (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.आर.वेंकटरमण, भारताचे माजी राष्ट्रपती, सर्वश्री हरिभाऊ पुर्णाजी गोळे, प्रभाकर पांडुरंग संझगिरी, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल मी शोक प्रस्ताव मांडतो.

"श्री.आर.वेंकटरमण, भारताचे माजी राष्ट्रपती, सर्वश्री हरिभाऊ पुर्णाजी गोळे, प्रभाकर पांडुरंग संझगिरी, माजी वि.प.स. यांच्या दुःखद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दुःख व्यक्त करते."

सभापती महोदय, कै. रामस्वामी वेंकटरमण यांचा जन्म 4 डिसेंबर 1910 रोजी तामिळनाडू राज्यातील तंजावूर येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए., एलएल.बी.पर्यंत झाले होते.

कै. वेंकटरमण यांनी 1942 मध्ये "भारत छोडो" आंदोलनात भाग घेतला, त्यात त्यांना कारावासही झाला होता.

कै. वेंकटरमण यांनी सुरुवातीस मद्रास उच्च न्यायालयात तसेच सर्वोच्च न्यायालयात वकिली केली होती. त्यांनी वकील मजदूर संघाचे प्रमुख तसेच 1947-50 मध्ये मद्रास बार फेडरेशनचे सदस्य म्हणूनही कार्य केले होते.

कै. वेंकटरमण हे काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. त्यांनी भारतीय विदेशी व्यापार संस्था, राष्ट्रीय संशोधन विकास निगम, कमिटी ऑन ऑटोमोशन तसेच तामिळनाडू राज्य विद्युत मंडळाची चौकशी समिती इत्यादी समितींचे समिती प्रमुख म्हणूनही काम केले होते.

कै. वेंकटरमण हे सन 1950-52 या काळात भारताच्या अंतरिम सरकारमध्ये सदस्य होते. तर सन 1957-62 व 1962-67 मध्ये मद्रास विधानपरिषदेवर ते निर्वाचित झाले होते. या काळात त्यांनी मद्रास राज्याचे उद्योग, कामगार, सहकार, ऊर्जा व परिवहन खात्याचे मंत्री म्हणून कार्य केले.

....बी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भुजबळ ....

कै. वेंकटरमण सन 1952, 1957, 1977 व 1980 असे चार वेळा लोकसभेवर निर्वाचित झाले होते. त्यांनी सन 1980-84 या काळात देशाचे अर्थ, उद्योग, गृह आणि संरक्षण या सारख्या महत्वाच्या खात्यांचे मंत्री म्हणून काम केले. तसेच त्यांनी सन 1967 मध्ये केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य म्हणून कामगार, उद्योग, ऊर्जा, दूरसंचार व रेल्वे इत्यादी विभागाच्या नियोजनात महत्वाची भूमिका बजावली होती.

कै. वेंकटरमण यांनी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे सदस्य, संयुक्त राष्ट्राच्या प्रशासकीय न्यायाधिकरणाचे अध्यक्ष तसेच युनोच्या व राष्ट्रकूल संसदीय मंडळाच्या विविध परिषदांमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व केलेले होते.

कै. वेंकटरमण यांनी सन 1984-87 मध्ये भारताचे उपराष्ट्रपती तर सन 1987-92 या कालावधीत भारताचे राष्ट्रपती हे सर्वोच्च पदही भूषविले होते.

कै. वेंकटरमण यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात घेतलेल्या सहभागाबद्दल त्यांना "ताम्रपत्र" या पुरस्काराने व रशियाच्या "सोवियत प्राईझ" पुरस्काराने तसेच युनोमध्ये उत्कृष्ट सेवा केल्याबद्दल युनोच्या महासचिवांतर्फे "सुवेनिअर" या सन्मानाने तर परमपूज्य शंकराचार्यांनी "सत् सेवा रत्न" या पुरस्काराने त्यांना सन्मानित केलेले होते.

कै. वेंकटरमण यांची अत्यंत कार्यकुशल प्रशासक अशी ख्याती होती. त्यांनी प्रत्येक पदावर काम करीत असताना आपल्या कार्याचा ठसा उमटविला. प्रचंड विद्वत्ता असणाऱ्या या व्यक्तिमत्वामध्ये कट्टर देशप्रेमदेखील होते. त्यांची विद्वत्ता आणि त्यांनी केलेली देशाची सेवा यामुळे ते प्रदीर्घ काळ सर्वांच्या स्मरणात राहतील. सार्वजनिक जीवनात त्यांनी उत्तम आदर्श प्रस्थापित केलेला आहे. त्यांनी आपल्या जीवनात उच्च नैतिक मूल्यांना महत्वाचे स्थान दिले. व्यवहारी दृष्टीकोन आणि शिस्तबद्धता या त्यांच्या वैशिष्ट्यांबरोबरच त्यांनी विधायक राजनीतिज्ञ आणि राजकीय विचारवंत असा लौकिक कमावला. त्यांचे थोर निष्कलंक चारित्र्य आणि अपार सेवाभावी वृत्ती यामुळे त्यांनी भावी पिढीसमोर आदर्शाचा वारसा ठेवला आहे.

अशा या ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, मुत्सद्दी-राजकारणी व कुशल प्रशासकाचे मंगळवार, दिनांक 27 जानेवारी 2009 रोजी दु:खद निधन झाले.

..... बी 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भुजबळ ....

सभापती महोदय, कै. हरिभाऊ पुर्णाजी गोळे यांचा जन्म 1 जुलै 1919 रोजी बुलढाणा जिल्ह्यात वरुड येथे झाला. त्यांचे शिक्षण आठवी पर्यंत झाले होते.

कै. गोळे यांनी स्वातंत्र्य चळवळीत सक्रीय भाग घेऊन मोलाचे योगदान दिले होते. त्यांची राहणी अत्यंत साधी होती. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा व साने गुरुजींचा सहवास त्यांना लाभला होता. त्यांनी आयुष्यभर निस्पृहपणे समाज सेवा केली.

कै. गोळे यांनी शिवाजी हायस्कूलच्या कार्यकारणीचे सदस्य तसेच अकोला जनता बँक, कापड व्यापारी मंडळ, बहुजन समाज सेवा मंडळ, काळा मारुती हुतूतू संघाचे अध्यक्ष तसेच संत तुकाराम कॅन्सर हॉस्पिटलचे ट्रस्टी म्हणूनही कार्य केले होते.

कै. गोळे यांनी सात वर्षे अकोला नगरपालिकेचे सदस्य म्हणून काम केले होते. ते कॉंग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. त्यांचा अनेक सामाजिक, शैक्षणिक व सहकारी संस्थांशी निकटचा संबंध होता.

कै. गोळे सन 1968 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. विधीमंडळाच्या विविध समित्यांवरही त्यांनी काम केले होते.

अशा या ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिकाचे शनिवार दिनांक 10 जानेवारी 2009 रोजी दु:खद निधन झ ाले.

सभापती महोदय, कै. प्रभाकर पांडुरंग संझगिरी यांचा जन्म 25 सप्टेंबर 1921 रोजी गोवा राज्यातील मोरजी येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.एस्सी. पर्यंत झाले होते.

कै. संझगिरी यांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता.

कै. संझगिरी यांनी मुंबई श्रमिक संघाचे अध्यक्ष, इंजिनिअरिंग वर्कर्स युनियनचे जनरल सेक्रेटरी, सीटू कामगार संघटनेचे पूर्णवेळ कार्यकर्ते, अखिल भारतीय सेंटर ऑफ ट्रेड युनियन्सचे उपाध्यक्ष म्हणून कार्य केले होते.

कै. संझगिरी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. त्यांनी महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्षाचे अध्यक्ष तसेच केंद्रीय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे उपाध्यक्ष म्हणून काम केले

.... बी 4 ...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भुजबळ ....

होते. पक्षाच्या अनेक आंदोलनांचे त्यांनी नेतृत्व केले, त्यात त्यांना कारावासही झाला होता. मार्क्सवादी चळवळीशी बांधिलकी जपणारा नेता अशी त्यांची ख्याती होती.

कै. संझगिरी यांनी "मानवाची कहाणी", "अणूच्या अंतरंगात", "चावार्क ते मार्क्स" ही पुस्तके लिहीली. तसेच मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र असलेल्या "जीवन मार्ग" या नियतकालिकाचे काही काळ संपादक म्हणूनही त्यांनी काम केले होते.

कै. संझगिरी हे आयुष्यभर कामगार, शेतकरी, शेतमजूर व कष्टकरी जनतेच्या प्रश्नांची सोडवणुक करण्यासाठी झटत राहीले.

कै. संझगिरी सन 1978 मध्ये भांडूप (मुंबई) मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर तर सन 1990 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे सोमवार दिनांक 9 मार्च, 2009 रोजी दु:खद निधन झाले.

***

( यानंतर श्री. सरफरे ... सी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, भारताचे माजी राष्ट्रपती श्री. आर. वेंकटरमण तसेच सर्वश्री हरिभाऊ पुर्णाजी गोळे, प्रभाकर पांडुरंग संझगिरी, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहाचे नेते माननीय श्री. छगन भुजबळ यांनी शोकप्रस्ताव मांडला आहे, त्याला समर्थन देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, भारताचे आठवे राष्ट्रपती श्री. रामस्वामी वेंकटरमण यांचे दिनांक 27 जानेवारी 2009 रोजी निधन झाले. दिनांक 25 जुलै 1987 रोजी भारताचे राष्ट्रपती म्हणून त्यांची निवड झाल्यानंतर त्यांच्या वाटेला आलेला कार्यकाळ हा अतिशय कसोटीचा होता. आघाडी सरकारे येण्याचा व जाण्याचा हा कार्यकाळ होता. त्यांच्या पाच वर्षाच्या कालावधीत त्यांना चार पंतप्रधानांबरोबर काम करावे लागले. पंतप्रधान पदासाठी त्यांना पाचारण करावे लागले. काळजीवाहू सरकारची धुरा सांभाळतांना काळजीवाहू पंतप्रधानांनी घेतलेले काही निर्णय त्यांना बदलायला लावले. ते स्वत: कायदेतज्ज्ञ असल्यामुळे त्यांनी त्या त्यावेळी घटनेतील तरतुदींचे काटेकोरपणे पालन केले.

त्यांच्याच कारकिर्दीत मंडल आयोग आणि रामजन्मभूमीचे आंदोलन तीव्र स्वरुपात होते. त्यांचाच परिणाम म्हणून देशात राजकीय उलथापालथ होत होती, परंतु त्या उलथापालथीमुळे अस्तित्वात येणारी आघाडी सरकारे घटनेतील तरतुदींनुसार अस्तित्वात येत आहेत की नाहीत हे पहाण्याचे अतिशय महत्वाचे काम त्यावेळी कै.वेंकटरमण यांना करावे लागले व त्यात ते यशस्वी झाले. आपल्या कारकिर्दीत त्यांनी व्ही.पी.सिंग, चंद्रशेखर, नरसिंहराव यांना पंतप्रधान पदाची शपथ दिली. राष्ट्रपती होण्यापूर्वी उपराष्ट्रपती तसेच त्याही पूर्वी संरक्षणमंत्री, अर्थमंत्री व नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष पद आदी महत्वाची पदे सांभाळली होती.

त्यांचा लोकसंग्रह दांडगा होता. आपल्या मैत्रीमध्ये त्यांनी पक्षीय बंधने कधीही येऊ दिली नाहीत. माननीय अटलबिहारी वाजपेयी यांच्या एका पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमात त्यांनी स्वत: उपस्थित राहून माननीय वाजपेयी यांची मुक्तकंठाने प्रशंसा केली होती. त्यावेळी त्यांच्यावर त्यांच्या पक्षातील लोकांकडून टीकाही झाली होती. परंतु त्यांनी त्याची पर्वा केली नव्हती.

सभापती महोदय, या पुस्तक प्रकाशनाच्या सोहळयाला मी त्यावेळी संसदेमध्ये असल्यामुळे उपस्थित होतो. अनेक वेळा काही मुद्यांच्या बाबतीत खासदारांच्या शिष्टमंडळासोबत राष्ट्रपती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

भवनामध्ये त्यांना भेटण्याची मला संधी मिळाली त्यावेळी मी त्यांचे व्यक्तिमत्व जवळून पाहिले आहे. अशाप्रकारे स्वातंत्र्य संग्रामामधील एक सैनिक, कॉंग्रेसचा एक अत्यंत कर्मठ कार्यकर्ता आता दिसणे दुरापास्त झाले आहे.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरग फुंडकर . . . .

एक उत्तम प्रशासक, कायदेतज्ज्ञ, कर्तव्यकठोर पण त्याचबरोबर एक सौजन्यशील व्यक्तिमत्व म्हणून श्री.आर.वेंकटरमण यांची कारकीर्द कायम स्मरणात राहील.

सभापती महोदय, कै.हरिभाऊ पुर्णाजी गोळे यांच्या बाबतीत सांगावयाचे तर ते माझ्याच जिल्ह्यातील रहिवासी होते. त्यांचा जन्म माझ्याच तालुक्यातील वरुड या गावामध्ये झाला. कै.हरिभाऊ गोळे यांनी त्यावेळच्या काँग्रेसच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या चळवळीमध्ये भाग घेतला आणि ते सुरुवातीपासूनच काँग्रेसचा एक सच्चा कार्यकर्ता म्हणून आयुष्यभर आपले जीवन जगले. आताच माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ साहेबांनी सांगितल्याप्रमाणे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा आणि साने गुरुजी यांच्या सहवासात त्यांनी आपल्या आयुष्याची अनेक वर्षे घालविली.तसेच समाजाची नि:स्पृहपणे सेवा करीत-करीत आपले आयुष्य घालविले.त्या कालावधीत त्यांनी आपले वास्तव्य बुलढाणा जिल्ह्यातून अकोला येथे हलविले. त्यांनी अकोल्यासाारख्या एका मोठया शहरामध्ये वास्तव्य करुन, आपल्या कामकाजाच्या माध्यमातून व्यक्तिमत्वाचा एक ठसा उमटविला होता. त्यावेळी अकोला शहरामध्ये नुकतीच जनता बँक स्थापन झाली होती. त्यांनी त्या बँकेचे डायरेक्टर म्हणून अनेक वर्षे काम केले आणि ती जनता बँक नावारुपाला आणली. तसेच अकोला शहरामध्ये कापडाची फार मोठी व्यापारी बाजारपेठ आहे. या बाजारपेठेचे एक मंडळ तयार केले आणि तेथील व्यापाऱ्यांचे देखील संघटन केले. अशा प्रकारे बहुजन समाजात जन्माला आलेल्या एका माणसाने सर्व व्यापाऱ्यांना एका सूत्रामध्ये बांधून कापडाच्या या बाजारपेठेचे कापड व्यापारी मंडळ तयार केले. तसेच बहुजन समाज सेवा मंडळही निर्माण केले. त्याचप्रमाणे सध्या अकोला शहरामध्ये असलेले संत तुकाराम कॅन्सर हॉस्पिटल हे सुध्दा व्यापारी लोकांनीच स्थापन केलेले होते.पण कै.हरिभाऊ पुर्णाजी गोळे यांना संचालक मंडळामध्ये घेतल्याशिवाय तेथील संचालक मंडळ पूर्ण होऊ शकलेले नाही.अशा प्रकारे विविध ठिकाणी काम करुन त्यांनी आपले आयुष्य समाजसेवेमध्ये घालविले. ते सात वर्षे अकोला नगरपालिकेमध्ये सदस्य म्हणून निवडून आले होते. त्यांचा अनेक सामाजिक संस्था, सहकारी संस्था आणि शैक्षणिक संस्थांशी निकटचा संबंध होता.ते काँग्रेस पक्षामध्ये असले तरी सुध्दा सामाजिक आणि राजकीय चळवळीमध्ये काम करणाऱ्या सर्व सदस्यांशी ते सतत संपर्क ठेवत असत,त्यामुळे मी अकोला मतदार संघातून खासदार झ ाल्यानंतर अनेक वेळा त्यांच्याकडे जात असे आणि मी भारतीय जनता पक्षाचा खासदार असताना

. . . .डी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

सुध्दा ते आम्हाला समाजकारणासंबंधी,राजकारणासंबंधी अनेक वेळा मार्गदर्शन करीत असत.असा एक थोर समाजसेवक शनिवार, दिनांक 10 जानेवारी 2009 रोजी आपल्यामधून निघून गेलेला आहे.

सभापती महोदय, कै.प्रभाकर पांडुरंग संझगिरी यांचा आणि माझा संबंध 1978 मध्ये आला. त्यावेळी मी पहिल्यांदा विधानसभेमध्ये निवडून आलो होतो आणि कै.प्रभाकर संझगिरी हे भांडूप मतदार संघातून निवडून आले होते.आम्ही सभागृहामध्ये दोनच वर्षे एकमेकांसोबत होतो.त्या दोन वर्षाच्या काळामध्ये मी त्यांच्या कामकाजाची पध्दत पाहिलेली आहे.ते अतिशय झुंजार, आक्रमक होते आणि कम्युनिस्ट पक्षाचे धोरण बरोबर घेऊन सर्वसामान्य माणसासाठी,कष्टकऱ्यांसाठी,काम करणाऱ्यांसाठी, शेतमजुरांसाठी लढणारा एक नेता म्हणून मी सतत त्यांना विधानसभेमध्ये आपल्या कामाची छाप निर्माण करताना पाहिलेले आहे आणि असे करीत असताना त्यांनी कधीही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या विचाराला ठेच पोहोचू दिलेली नाही आणि त्या विचारानेच त्यांनी महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये आणि विधान परिषदेमध्ये काम केलेले आहे.अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे सोमवार, दिनांक 9 मार्च 2009 रोजी दु:खद निधन झाले आहे, त्याबद्दल सभागृहाच्या नेत्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत,त्याच्याशी मी सहमत आहे.मी माझ्या भारतीय जनता पक्षाच्यावतीने आणि व्यक्तिगतरित्या त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

. . . .डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी भारताचे माजी राष्ट्रपती श्री.आर.वेंकटरमण, सर्वश्री.हरिभाऊ पुर्णाजी गोळे, प्रभाकर पांडुरंग संझगिरी माजी वि.प.स. यांच्या दुःखद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्या प्रस्तावाला माझा भावनात्मक पाठिंबा देत असताना, भारताचे माजी राष्ट्रपती श्री.आर.वेंकटरमण यांच्याबाबत माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे, त्यांचा पाच वर्षाचा जो काळ आहे.

यानंतर कु.थोरात . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्या काळामध्ये या देशाला लाभलेले पंतप्रधान, विशेषत: 40 दिवसांचे पंतप्रधान या देशाने पाहिले आहेत. त्यावेळी प्रचारासाठी असलेले पोस्टर मला आजही आठवते. "आमचे चाळीस दिवस आणि तुमचे चाळीस महिने" असा श्री. चंद्रशेखर यांनी प्रचार केला होता. अशा अस्थिरतेत असलेल्या राष्ट्रपतींची ती कारकीर्द होती. एक स्वातंत्र्यसेनानी म्हणून ताम्रपट देऊन त्यांचा सन्मान झालेला होता. या देशामध्ये ताम्रपट मिळालेले फार मोजकेच स्वातंत्र्यसेनानी आहेत, त्यापैकी ते एक होते.

त्यावेळी लोकसभेची निर्मिती झाली नव्हती. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तात्पुरती लोकसभा म्हणजे प्रोव्हिन्शल पार्लमेंन्ट 1950 ते 1952 पर्यंत होती तिचे ते सदस्य होते. त्यानंतर पहिल्या लोकसभेचे 1952 ते 1957 पर्यंत ते सदस्य होते. या देशाच्या राजकारणामध्ये लोकसभेने या देशाला दिशा देण्याचे काम केले आहे. त्या लोकसभेच्या निर्मितीच्या पहिल्या दिवसापासून ते लोकसभेचे सदस्य होते, असे हे थोर व्यक्तिमत्व होते. सभापती महोदय, 6 व्या लोकसभेमध्ये म्हणजे सन 1977 ते 1979 पर्यंत आणि 7 व्या लोकसभेमध्ये म्हणजे सन 1980 ते 1984 पर्यंत त्यांची लोकसभेची कारकीर्द होती. त्यानंतर लोकसभेच्या पुढच्या निवडणुकीमध्ये ते निवडून आल्या नंतरही त्यांनी लोकसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला आणि आताच्या तामिळनाडू व त्यावेळच्या मद्रास सरकारमध्ये ते परत गेले व आपल्या राज्याकरिता सर्व कार्य करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. खासदार व्हावे की आमदार व्हावे याबाबतचे प्रलोभन त्यांच्यासमोर असतानाही लोकसभेच्या पहिल्या दिवासापासून लोकसभेमध्ये काम केलेल्या व्यक्तिने लोकसभेच्या सदस्यत्वाचा त्याग केला आणि स्वत:च्या राज्यामध्ये जाऊन तेथे उद्योग मंत्री, कामगार मंत्री, सहकार मंत्री, ऊर्जा मंत्री आणि परिवहन मंत्री म्हणून काम केले. एवढया विविध खात्याचा प्रदीर्घ अनुभव असलेले हे व्यक्तिमत्व असताना ते पुन्हा एकदा प्लॅनिंग कमिशनचे अध्यक्ष झाले. त्यानंतर 7 व्या लोकसभेमध्ये त्यांनी या देशाचे अर्थखाते सांभाळले, संरक्षण खाते सांभाळले. राज्याबरोबरच केंद्र सरकारमध्ये सुध्दा विविध खात्यामध्ये समर्थपणे ठसा उमटविण्याचे काम त्यांनी केले. असा सर्वोच्च अशा प्रकारचा प्रशासकीय अनुभव असलेल्या व्यक्तीला, या देशाला स्वातंत्र्य मिळाले नव्हते तेव्हा सन 1935 साली बारकौन्सिलचे अध्यक्षपद मिळाले होते, असे हे व्यक्तिमत्व या देशाला राष्ट्रपती पदाकरिता लाभले हे आपले भाग्य होते. त्याग कशाला म्हणतात याची त्यांना जाणीव होती. सत्तेचे सामर्थ्य कसे असते

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

आणि ते कसे सांभाळले पाहिजे याची त्यांना जाण होती. राष्ट्रपतींनी जरी मंत्रिमंडळाच्या निर्णयाप्रमाणे राज्यकारभार करावयाचा असतो तरी सुध्दा एखादा निर्णय देशाकरिता आणि सामान्य माणसाकरिता योग्य वाटत नसेल तर त्यावर आपले मत व्यक्त करुन तो निर्णय परत पाठविण्याचे काम करुन सरकारला जाग आणण्याचे, काम करण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये होते. कारण त्यांची जी तपश्चर्या असते ती ते काम करुन जाते. असे व्यक्तिमत्व आपल्यातून हरवले आहे. त्यांच्या दु:खद निधनाबद्दलच्या शोकप्रस्तावाला मी समर्थन देतो.

अकोला महानगरपालिकेत काही वर्षे सदस्य असलेले बुलढाणा जिल्हयाचे माजी सन्माननीय सदस्य श्री..हरिभाऊ गोळे तसेच माजी सन्माननीय सदस्य श्री. प्रभाकर पांडुरंग संझगिरी यांचे दु:खद निधन झालेले आहे.

माजी सन्माननीय सदस्य श्री. प्रभाकर संझगिरी हे कम्युनिष्ट चळवळीमध्ये होते. त्यांच्या सगळया चळवळीबद्दल वर्तमानपत्रात छापून येत असे. श्री. प्रभाकर संझगिरी सारख्या व्यक्तिमत्वाबद्दल आम्ही शाळेमध्ये असल्यापासून वाचत होतो. पण काही माणसे अल्प काळा करिता येथेपर्यंत येतात आणि जातात. सतत गोरगरिबांकरिता काम करणा-या माणसाला राजकारणात स्थान फार कमी मिळते आणि यापुढे तर ते फारच कठीण आहे.

यानंतर श्री. बरवड ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

आदर्श समाजसुधारक म्हणता येईल, समाजसेवक सेवक म्हणता येईल तसेच कम्युनिझमच्या तत्वांशी पूर्णपणे एकनिष्ठ असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. त्यावेळी कम्युनिस्ट पक्ष आणि आमच्या शिवसेनेचा संघर्ष चालावयाचा. हे सर्व आम्ही त्यावेळी पाहिलेले आहे. पण त्यांनी कधी आपल्या तत्वांशी तडजोड केली नाही. कायम संघर्ष करावयाचा या मानसिकतेतील ही सर्व थोर मंडळी आज आपल्यातून निघून गेलेली आहेत. मी माननीय सभागृहाच्या नेत्यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला अनुमोदन देतो आणि दिवंगतांच्या आत्म्यास सद्‌गती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT

प्रा. बी. टी. देशमुख ( अमरावती विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री यांनी या सभागृहामध्ये जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याच्याशी सहभावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ज्या तीन व्यक्तींना आज आपण श्रध्दांजली अर्पण करीत आहोत त्या तीनही व्यक्तींच्या बाबतीत एकसारखी लागू पडणारी एक गोष्ट कोणती दिसत असेल तर ती म्हणजे या तीनही व्यक्ती थोर स्वातंत्र्यसेनानी होत्या. या तिघांचाही स्वातंत्र्य आंदोलनाशी अतिशय जवळून संबंध आलेला होता. श्री. हरिभाऊ गोळे यांच्या बाबतीत अकोल्यामध्ये अतिशय सामान्य परिस्थितीला तोंड देत देत अनेक पदे भुषवून सुध्दा आपल्या जागेवर निस्पृहपणाने काम करीत राहणाऱ्या व्यक्तींपैकी एक अतिशय महत्वाची व्यक्ती म्हणून आमच्या विदर्भामध्ये त्यांचे नाव घेतले जाते. ते फार काळ विधान परिषदेमध्ये नव्हते. त्यांना विधान परिषदेमध्ये पाच-सहा वर्षाची टर्म मिळाली. काही वर्षे ते नगरपालिकेमध्ये होते. पण त्यांची सर्वात महत्वाची जर कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे ते त्यांच्या पक्षाशी एकनिष्ठ होते. अनेक पदांवर राहून सुध्दा निस्पृहता आणि गरिबी यांची कास त्यांनी शेवटपर्यंत सोडली नाही. त्यांनी गवंडीकाम केले. घरावरील कौले फेरण्याचे काम सुध्दा त्यांनी केले. त्यांनी दहीहंडा रोडला एक छापखाना चालवला. त्यांनी काही दिवस 'मातृभूमी' मध्ये काम केले. काही दिवस त्यांनी 'नवशक्ती' मध्ये 17 रुपये पगारावर काम केले. नंतर ते अकोल्याला परत आले. अकोल्याला परत आल्यानंतर ते पक्षाच्या कामाला लागले. त्यांच्या एकंदर व्यक्तिमत्वाची माहिती आपल्याला व्हावी म्हणून दोन गोष्टी मला सांगितल्याशिवाय राहावत नाही. श्रीमती इंदिराजी गांधी यांनी एका जाहीर सभेमध्ये त्यांचा उल्लेख 'अकोल्यातील लाल बहादूर शास्त्री' असा केला होता. सभापती महोदय, गाडगे महाराज आपल्या ट्रस्टवर माणसे घेत असताना फार चूझी असावयाचे. त्या माणसाची एकंदर नस नि नस ओळखून मगच त्या माणसाला ते आपल्या ट्रस्टवर घेत असत. श्री. हरिभाऊ गोळे हे गाडगे महाराजांच्या ट्रस्टवर अनेक वर्षेपर्यंत काम करीत होते एवढी एक गोष्ट जरी सांगितली तरी श्री. हरिभाऊ गोळे यांचा पूर्ण परिचय करुन दिल्यासारखे होईल असे मला असे वाटते. विधान परिषद सदस्य होण्याच्या पूर्वी त्यांनी एक

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT

प्रा. बी. टी. देशमुख ......

लहानसे कापडाचे दुकान लावले होते. ते जवळजवळ 90 वर्षाचे आयुष्य जगले. विधान परिषदेचे सदस्यत्व संपल्यानंतर आतापर्यंत सुध्दा ते आपल्या त्या छोट्याच्या कापडाच्या दुकानामध्ये बसून आपला एकंदर उदरनिर्वाह करीत होते. खरे म्हणजे विधान परिषदेची सहा वर्षाची टर्म संपल्यानंतर अशा पध्दतीने कापडाच्या दुकानामध्ये जाऊन बसणे ही एक दुर्मिळ गोष्ट आहे. त्यांनी 'मराठा स्टोअर' नावाचे छोटेसे स्टोअर काढले होते. शेवटपर्यंत ते त्याच पध्दतीने राहिले. तसे राहात असताना आणि काँग्रेसच्या चळवळीमध्ये सहभागी होत असताना त्यावेळी प्रसिध्द झालेली एक गोष्ट मला आठवते. गांधीजींनी त्यांना सांगितले की, आपण हरिजन फंडाला पाच रुपये वर्गणी द्यावी. त्यांनी हरिजन फंडाला पाच रुपये वर्गणी दिली आणि ते गांधीजींच्या चळवळीमध्ये सहभागी झाले. आहे त्या परिस्थितीत राहून त्यांनी गरीब मुलांना मदत करण्याचे काम केले. खरे म्हणजे साधारणपणे खूप धनाढ्य असलेली माणसे मदत करतात असे आपण मानतो. त्यांचा धनाढ्यात समावेशच नव्हता. पण गरिबीतून सुध्दा हे काम करता येते. त्यांनी अनेक मुलांना मदत केली. मला अतिशय प्रखरपणे त्यावेळचे एक उदाहरण आठवते. रामतीर्थमध्ये एक अतिशय कुशाग्र बुध्दीचा मुलगा होता. त्याला शिक्षणाच्या कामामध्ये श्री. हरिभाऊ गोळे यांनी फार मदत केली. तू कलेक्टर झ ाला पाहिजेस असे त्यांनी सांगितले. खरोखर तो मुलगा कलेक्टर झाला आणि आज आपल्या मंत्रालयामध्ये सिनियर सेक्रेटरी आहे. या सबंध कामाकडे पाहण्याची त्यांची ही जी वृत्ती होती ती खरोखर अनुकरण करावी, दृष्ट लागावी अशी होती आणि शेवटपर्यंत ते आपल्या सर्व मर्यादा सांभाळून जगले.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 14:45

(प्रा. बी.टी.देशमुख...

श्री. प्रभाकर पांडुरंग संझगिरी हे या विधानपरिषदेचे 6 वर्षे सदस्य होते. त्याच प्रमाणे ते विधानसभेचेही 2 वर्षे सदस्य होते. त्यांच्या संसदीय कारकिर्दीपेक्षा कम्युनिस्ट विचारांवर त्यांची श्रध्दा होती आणि सभागृहाच्या बाहेरील चळवळीमध्ये त्यांचा फार मोठा सहभाग होता. ठाम विचारावर श्रध्दा ठेवून त्याच विचारांची पताका त्यांनी शेवटपर्यन्त खांद्यावर ठेवली. त्यांचे व्यक्तिमत्व, त्यांची बोलण्याची पध्दत तसेच वक्तृत्वाची शैली, मुद्दे मांडण्याची पध्दत ह्या गोष्टी सर्वसाधारणपणे कम्युनिष्ट पक्षाच्या नेत्याला सहज शोभून दिसाव्यात अशा प्रकारच्या नव्हत्या. त्यांची धारदार परंतु संथ आवाजामध्ये बोलण्याची पध्दत होती. संथ आवाजामध्ये सुध्दा मुद्यातील प्रखरपणा ते कधीही हरवू देत नसत, अशा प्रकारचे एक वेगळे रसायन प्रभाकर संझगिरी यांच्या स्वरुपात आम्हाला पहायला मिळाले.

भारताचे माजी राष्ट्रपती श्री.आर. वेंकटरमण हे सुध्दा एक थोर स्वातंत्र्यसेनानी होते. श्री.आर.वेंकटरमण यांच्या बाबतीत मला स्वत:ला एक गोष्ट महत्वाची वाटते ती अशी की, पहिल्या आणि दुस-या राष्ट्रपतीनंतर राष्ट्रपतीने उपराष्ट्रपती आणि नंतर राष्ट्रपती व्हावे अशा प्रकारची जी प्रथा पडत होती ती विखंडित होण्याची स्थिती या देशामध्ये आली होती. परंतु त्या मालिकेत जाऊन बसण्याचा मान श्री. आर. वेंकटरमण यांना मिळाला. ते उपराष्ट्रपती झाले. नंतर राष्ट्रपती म्हणून त्यांनी काम पाहिले. त्यांनी प्रदीर्घ असे संसदीय कार्य केलेले आहे. ते मद्रास विधानसभेमध्ये अनेक खात्याचे मंत्री होते. चार वेळा ते लोकसभेवर निवडून गेले. तेथे सुध्दा त्यांनी अनेक खात्यांच्या प्रमुखपदी, मंत्री म्हणून काम केले. उपराष्ट्रपती म्हणून आणि त्यानंतर राष्ट्रपती म्हणून कोणालाही नाव ठेवता येणार नाही अशा प्रकारचा सार्वजनिक जीवनाचा प्रवास त्यांनी संपविला. 98-99 वर्षाचे प्रदीर्घ आयुष्य त्यांना लाभाले. मी त्यांना मनापासून श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सभागृहाने नेते, माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावाच्या संदर्भात माझ्या सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विचारांवर कर्मठ निष्ठा आणि समर्पित जीवन अशा समान शब्दामध्ये या तिघांचे वर्णन करता येईल. या तिघांपैकी कॉ. संझगिरी यांचा स्नेह आणि सहवास मला मिळाला होता. मार्क्सवादी, लेनिनवादी विचारावरची त्याची श्रध्दा सोव्हिएत युनियन कोसळल्यानंतर सुध्दा कमी झाली नाही. उलट ती उत्तरोत्तर वाढत गेली हे पाहण्यात आले होते. बृहन्मुंबईतील कष्टक-यांचा ते आवाज होते. कामगारांचे ते नेते होते. उत्तम शैलिदार लेखक होते आणि तितकेच परखड विचारवंत होते. तरुण कार्यकर्त्यांना सुध्दा त्यांचे प्रोत्साहन असे. कॉ. संझगिरी यांच्या निधनाने कष्टक-यांचे मोठे नुकसान झालेले आहे. या तिन्ही महनीय व्यक्तींना लोकभारती तर्फे मी श्रध्दांजली अर्पण करतो.

-----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

कॉ. प्रभाकर संझगिरी यांच्या बरोबर काम करण्याची मला संधी मिळाली. त्यांनी विधानसभेमध्ये 2 आणि विधानपरिषदेमध्ये 6 वर्षे अत्यंत प्रभावीपणे काम केले. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी सांगितल्या प्रमाणे कॉ. संझगिरी हे संसदीय कामकाजापेक्षा चळवळीमध्ये जास्त रमले. गरिबांचे आणि कष्टक-यांचे प्रश्न सोडविण्याला त्यांनी जास्त प्राधान्य दिले. त्यांच्या या कार्यात त्यांच्या पत्नी कॉ. सुमन संझगिरी यांनी त्यांना सातत्याने साथ दिली. तलासरी आणि जव्हार यासारख्या आदिवासी भागामध्ये दोन-दोन महिने जंगलामध्ये राहून आदिवासींचा जीवनस्तर उंचावण्यासाठी त्यांनी केलेले काम मी स्वत: बघितलेले आहे. त्यांच्या अनेक अभ्यासवर्गाना मी स्वत: गेलो होतो.

.....यानंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेब मघाशी म्हणाले ती गोष्ट खरी आहे. डाव्या विचारांची माणसे आक्रमक बोलतात. जोरात बोलतात. पण कॉ.संझगिरी हे अतिशय शांतपणे आणि संथपणे बोलत असत. समोरच्या माणसाच्या हृदयात कसे जायचे असा त्यांचा सातत्याने प्रयत्न असावयाचा. कॉ.संझगिरी आजारी होते त्यावेळी मी तीन,चार वेळा प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी गेलो होतो. विधानपरिषद सदस्य म्हणून दुस-यावेळी निवडणुकीस उभा राहण्यापूर्वी मी प्रथम त्यांच्याकडे गेलो आणि त्यांना सांगितले की, मी विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी पुन्हा उभा राहतो आहे. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, तू काळजी करु नको. माझा तुला संपूर्ण पाठिंबा आहे. आम्ही अलिबाग येथे बुध्ददेव भट्टाचार्य यांचे समवेत दोन दिवसाचे शिबीर आयोजित केले होते. त्यावेळी कॉ.संझगिरी यांची प्रकृती त्यांना साथ देत नव्हती. तरी देखील त्यांनी त्या शिबिरात अतिशय प्रभावी भाषण केले आहे. त्यांच्या त्यावेळच्या भाषणाची आठवण आजही आम्हाला होत आहे. रायगड जिल्हयात ग्रॅन्डव्हील , जे.एन.पी.टी. हे प्रकल्प होत असताना त्यांनी अनेक कामगार चळवळी सुरु केल्या होत्या. कामगार चळवळीतून आपल्या सारखे वैचारिक कार्यकर्ते निर्माण करण्याचे काम त्यांनी केले आहे. कॉ.संझगिरींच्या दु:खद निधनाबद्दल मी माझ्या पक्षाच्यावतीने दु:ख व्यक्त करतो.

भारताचे माजी राष्ट्रपती श्री.वेंकटरमण आणि या सभागृहाचे माजी सदस्य श्री. हरिभाऊ गोळे यांच्याही दु:खद निधनाबद्दल मी शोक व्यक्त करतो आणि माझे बोलणे संपवितो.

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुमंत गायकवाड ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी जो शोकप्रस्ताव सभागृहात मांडला आहे, त्यास पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

कॉ.प्रभाकर संझगिरी हे माझे अत्यंत जवळचे मित्र होते. मुंबई शहरात अनेक कामगार लढयात आम्ही एकत्रितपणे काम केले आहे. शेतमजुरांचा लढा असेल, मुंबई शहरातील झोपडपट्टी विकाससंबंधीचा लढा असेल अशा लढयांमध्ये त्यांच्यासमवेत काम करण्याची संधी मला मिळाली आहे. ते विचाराने पक्के होते. कामगारांच्या अडचणी सोडविण्यामध्ये त्यांचा हातखंडा होता. अतिशय तळमळीने काम करणा-या नेत्याचे निधन झाल्याने मला अतिशय दु:ख होत आहे.

भारताचे माजी राष्ट्रपती श्री.आर.वेंकटरमण हे स्वातंत्र्य सेनानी होते. त्यांनी या देशातील मोठमोठी पदे भुषविलेली आहेत. असे थोर गृहस्थ आज आपल्यातून निघून गेले, त्याचे मला मनस्वी दु:ख होत आहे.

माजी विधान परिषद सदस्य श्री.हरिभाऊ पूर्णाजी गोळे हे अतिशय चांगले सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांचेही दु:खद निधन झालेले आहे. या तिघा दिवंगताना रिपब्लिकन पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अपर्ण करतो आणि माझे भाषण संपवितो.

----------

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांना सांगू इच्छितो की, आजच्या शोक प्रस्तावावर बोलण्याची परवानगी द्यावी अशा प्रकारचे पत्र आपण मला दिलेले आहे. परंतु मी सांगू इच्छितो की, सभागृहात शोक प्रस्ताव मांडल्यानंतर सभागृहाचे नेते, विरोधी पक्ष नेते तसेच गट नेते एवढया मर्यादेतच बोलण्याची संधी देण्यात यावी अशा प्रकारचा निर्णय कामकाज सल्लागार समितीमध्ये घेण्यात आलेला आहे. त्यामुळे मी सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांना या शोक प्रस्तावावर बोलण्याची परवानगी देऊ शकत नाही.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित ) : सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी श्री.आर.वेंकटरमण, भारताचे माजी राष्ट्रपती, सर्वश्री हरिभाऊ गोळे, प्रभाकर पांडुरंग संझगिरी, माजी विधानपरिषद सदस्य यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव सभागृहात मांडला आहे, त्यास पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

कै.वेंकटरमण हे ज्येष्ठ स्वातंत्र सेनानी होते तसेच घटना तज्ञ म्हणून देखील ओळखले जावयाचे. त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळात विविध खात्यांचा कार्यभार सांभाळलेला आहे. तसेच त्यांनी विविध पदे देखील भुषविलेली आहेत.

कै. हरिभाऊ गोळे यांच्याबद्दल बोलावयाचे झाले तर एकनिष्ट व आदर्श असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. त्यांच्या जीवनाला संत गाडगे महाराज, संत तुकडोजी महाराज, स्व. इंदिरा गांधी यांचा स्पर्श लाभलेला आहे.

कै.प्रभाकर संझगिरी हे डाव्या विचारांशी एकनिष्ठ होते .....

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड.......

श्रमजीवी वर्गासाठी संघर्ष करणाऱ्या आणि आयुष्यभर एका तत्वाला जपलेल्या या तिघांमध्ये एक साम्य आहे, ते म्हणजे हे तिघेही ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांना काँग्रेस पक्षाच्या वतीने मी श्रध्दांजली वाहतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सदनाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ साहेब यांनी भारताचे माजी राष्ट्रपती आर.वेंकटरमण, सर्वश्री हरिभाऊ गोळे व प्रभाकर संझगिरी यांच्या दु:खद निधनाबद्दल याठिकाणी सभागृहात शोक प्रस्ताव मांडला आहे. या शोक प्रस्तावाला मी पाठिंबा देतो आणि या निमित्ताने माझे विचारही मांडतो.

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये भारतीय स्वातंत्र्याकरिता ज्यांनी प्रत्यक्ष कणखरपणे लढा दिला त्यापैकी सन्माननीय आर.वेंकटरमण, हरिभाऊ गोळे आणि प्रभाकर संझगिरी हेही आहेत. आर.वेंकटरमण यांच्या बाबतीत याठिकाणी विचार मांडत असताना मी सांगू इच्छितो की, ते एक अत्यंत कुशल संघटक, अत्यंत उत्कृष्ट प्रशासक, घटनातज्ज्ञ होते. यापूर्वीच्या वक्त्यांनी सभागृहात सांगितल्याप्रमाणे मद्रास विधानपरिषदेचे ते दोनवेळा सदस्य होते. त्या दरम्यानच्या काळात मद्रास राज्यामध्ये उद्योग आणि अन्य खात्याचे ते मंत्रीही होते. असे सांगितले जाते की, आजच्या तामीळनाडू आणि त्यावेळच्या मद्रास राज्याची औद्योगिक प्रगती किंवा एकंदरीत जी जडणघडण झाली त्यामध्ये आर.वेंकटरमण ज्यावेळी मद्रास राज्याचे उद्योगमंत्री होते त्या काळात त्यांनी केलेले जे मुलभूत कार्य कारणीभूत आहे. ते कार्य म्हणजे आजच्या तामिळनाडूमध्ये अत्यंत चांगल्या पध्दतीचा उद्योग खात्याचा कारभार मानला जातो. त्या अनुषंगाने त्यांनी केलेल्या कामाचा उल्लेख सातत्याने दक्षिण भारतामध्ये ज्यावेळी आपण जातो त्यावेळी अनेक ठिकाणी आपण ऐकतो.

भारतीय लोकशाहीच्या अनुषंगाने ते लोकसभेचे चारवेळा सदस्य म्हणून निवडून आले. देश पातळीवर त्यांनी अनेक खात्याचे मंत्री म्हणूनही काम केले. याठिकाणी आपण सर्वांनी सांगितल्याप्रमाणे ते भारताचे आठवे राष्ट्रपती होते. 1984 ते 1987 या काळात उपराष्ट्रपती म्हणूनही त्यांनी काम केले होते आणि 1987 ते 1992 या काळात राष्ट्रपती या नात्याने त्यांनी या देशाची सेवा केली. एक अत्यंत ध्येयनिष्ठ, प्रखर अभ्यासू, विद्वान आणि देशासाठी अनेक क्षेत्रात काम केलेले व्यक्तिमत्व, ज्यांना या देशाचे राष्ट्रपती म्हणून सर्वोच्च बहुमान प्राप्त झाला, त्या पदावर विराजमान होण्याची संधी त्यांना लाभली. अत्यंत चांगल्या पध्दतीने त्यांनी काम केले.

कै.हरिभाऊ पूर्णाजी गोळे यांचा आणि माझा व्यक्तिगत परिचय जरी नसला तरी संत गाडगे महाराज, संत तुकडोजी महाराज, साने गुरुजी यांच्या सान्निध्यात हे व्यक्तिमत्व अकोला शहरामध्ये होते आणि गरिबीचे चटके काय असू शकतात हे पहात असताना आपले विचार, आपली ध्येयनिष्ठा या अनुषंगाने गोरगरीब व सर्वसामान्य समाजासाठी अकोला आणि विदर्भामध्ये त्यांनी काम केले.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .......

या सदनाचे सुध्दा ते माजी सदस्य होते. मघाशी सभागृहात उल्लेख केल्याप्रमाणे राष्ट्रीय नेत्या स्व. इंदिरा गांधी यांनी सुध्दा त्यांच्या कामाचा गौरव केला. असे सन्माननीय सदस्य श्री. हरिभाऊ पूर्णाजी गोळे यांचे दुर्दैवाने निधन झालेले आहे.

त्यानंतर या सदनाचे माजी सदस्य प्रभाकर संझगिरी यांच्या बाबतीत मी असे सांगू इच्छितो की, मलाही त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली आहे. सन 1978 मध्ये ते विधानसभा सदस्य म्हणून काम करीत होते त्यावेळेस मी देखील त्या सदनाचा सदस्य होतो. त्याचबरोर सन 1990 मध्ये माझ्यासोबत ते विधानपरिषदेचेही सदस्य होते. श्रमिक चळवळीमध्ये अत्यंत जबरदस्त ध्येयवादाने प्रेरित होऊन काम करणारे अपवादात्मक व्यक्तिमत्व असेच स्व. प्रभाकर संझगिरी यांच्या बाबतीत म्हणावे लागेल. ते खालच्या सभागृहात ज्या ज्या वेळेस बोलत होते त्या त्या वेळेस त्यांचे विचार ऐकताना विशेषत: त्यांच्या विचारातून व ध्येयवादातून गोरगरीब व सामान्य समाजावर होणारा अन्याय परखडपणे मांडण्याचाच ते प्रयत्न करीत असत. अत्यंत महत्वाचे विचार ते मांडत असत. आयुष्यभर त्यांनी जी कम्युनिस्ट विचारसरणी डोळ्यासमोर ठेवली त्या कम्युनिस्ट विचारसरणीमध्ये काम करीत असताना त्यांचे व्यक्तिगत जीवनातील वागणे सुध्दा अत्यंत शांत व मनमिळाऊ होते. सर्वांवर प्रेम करणारे असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. असे व्यक्तिमत्व आज आपल्यातून निघून गेलेले आहे. त्यांना मी सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

सन्माननीय सभासदांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियाकडे पाठविण्यात येईल.

-----------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: शोक प्रस्तावानंतर सभागृहाचे कामकाज तहकूब करणे

श्री. छगन भुजबळ (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, कै.आर. वेंकटरमण, भारताचे माजी राष्ट्रपती, सर्वश्री हरिभाऊ पूर्णाजी गोळे, प्रभाकर पांडुरंग संझगिरी, माजी वि.प.स. यांच्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी सभागृहाचे आजचे कामकाज तहकूब करावे, अशी सूचना मी मांडतो.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभापती** : कै.आर. वेंकटरमण, भारताचे माजी राष्ट्रपती, सर्वश्री हरिभाऊ पूर्णाजी गोळे, प्रभाकर पांडुरंग संझगिरी, माजी वि.प.स. यांच्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी सभागृहाचे आजचे कामकाज तहकूब करावे, अशी सूचना माननीय उप मुख्यमंत्र्यांनी केली आहे आणि त्या सूचनेला माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अनुमोदन दिले आहे. मला ही सूचना मान्य आहे.

कै.आर. वेंकटरमण, भारताचे माजी राष्ट्रपती, सर्वश्री हरिभाऊ पूर्णाजी गोळे, प्रभाकर पांडुरंग संझगिरी, माजी वि.प.स. यांच्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी सभागृहाची बैठक आता स्थगित होईल व मंगळवार, दिनांक 17 मार्च, 2009 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 03 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 17 मार्च, 2009 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही